दिनांक 07/03/2023

# प्रसिध्दी पत्रक

आरोपी लोकसेवक -क्रं.01) दयानंद ओहळ, पद- पो.हे.कॉ. 02) अविनाश गणेश दाभाडे, वय 33 वर्षे, पद- पोलीस अंमलदार दोन्ही नेमणुक पोलीस स्टेशन एमआयडीसी सिडको औरंगाबाद शहर, (वर्ग-3), यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रोख रक्कम 3000/- रुपये स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. सिडको, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | 01) दयानंद ओहळ, पद- पो.हे.कॉ. रा. जानकी हॉटेल जवळ, पिसादेवी रोड औरंगाबाद<br>02) अविनाश गणेश दाभाडे, वय 33 वर्षे, पद- पोलीस अंमलदार, रा. सिध्दार्थ नगर, एन-12 हडको औरंगाबाद दोन्ही नेमणुक पोलीस स्टेशन एमआयडीसी सिडको औरंगाबाद शहर |
| लाच मागणी रक्कम | :- | 5000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 3000/- रुपये. |
| तपास अधिकारी | :- | श्री. हनुमंत वारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांना विना परवाना दारु विक्री करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांच्या हॉटेलमध्ये कोल्ड्रींग, ग्लास चा व्यवसाय असून हॉटेलमध्ये विना परवाणा दारु विक्री करु देण्यासाठी आ.लो.से. क्रं. 01 श्री. दयानंद ओहळ, पोहेकॉ हे तक्रारदार यांच्याकडे मासिक हप्ता म्हणुन 5000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. क्रं. 01 श्री दयानंद ओहळ यांनी तक्रारदार यांच्याकडे 5000/- रुपयाची मागणी करुन तडजोडीअंती 3000/- रुपये पंच साक्षीदारांसमक्ष लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि.07/03/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. क्रं. 01 श्री. दयानंद ओहळ, पोहेकॉ. यांचे सांगणेवरुन आ.लो.से.क्रं.02 अविनाश दाभाडे यांनी लाचेची रक्कम 3000/-रुपये पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार यांचे हॉटेल चिकलठाणा औरंगाबाद येथे स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह आ.लो.से. श्री. अविनाश दाभाडे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. आ.लो.से.क्रं.01 ओहळ व क्रं. 02 दाभाडे यांचे विरुद्ध पो.ठाणे एमआयडीसी सिडको, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हनुमंत वारे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस अंमलदार शिरीष वाघ, साईनाथ तोडकर, चालक पो.अ. सी. एन. बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ऍप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

**(मारुती शंकर पंडित)**
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद.